248

Printing Area UGC Jr.No.43053 UGC Approved Refereed Journal


ISSN 2394-5303

L.S.
14.03.2018

# Printing Area

Issue-39, Vol-03, March 2018
International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap




www.vidyawarta.com

Lokmanya ... Dist. Chandrapur

Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-03 | 01

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

March 2018, Issue-39, Vol-03

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

25) लोकशाही परिप्रेक्ष्याच्या संदर्भात ट्रम्प शासनाची वाटचाल....
प्रा. विठ्ठल सदाशिव चौधरी, पोंभुर्णा, जि. चंद्रपूर || 111

26) भारतातील असंघटीत क्षेत्रातील महिला सबलीकरण
डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख, कन्नड जि. औरंगाबाद || 114

27) महात्मा गांधी आणि सर्वोदय तत्वज्ञान
प्रा.डॉ. प्रमोद दामोदर देवके. मंगरूळपीर जि.वाशिम. || 119

28) पोलादपूर तालुक्याची शहीद परंपरा
प्रा. प्रभाकर गणपत गावंड, पोलादपूर—रायगड || 122

29) वृध्दांची ओळख
डॉ. प्रान्जु हिरेखन, यवतमाळ || 127

30) नविन जागतिक व्यवस्थेतील भारत चीन संबंध व संयुक्त राष्ट्रसंघटना: एक विश्लेषण
प्रा. रमेश राऊत, नाशिक || 132

31) विनोबांची सामाजिक क्रांती
प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर, वरोरा, जि. चंद्रपूर (महा.) || 139

32) भारतीय भाषाओं के लिए देवनागरी लिपि की उपयोगिता
डॉ.विलास कांबळे, ता.अहमदपूर जि. लातूर || 144

33) साहित्य:शांति एवं सांस्कृतिक और अध्यात्मिक एकता का सूत्र
डॉ.विजयप्रसाद के अवस्थी,नाशिक (महाराष्ट्र). || 148

34) संविधान की मूल भावना और अनुच्छेद ३७०
डॉ. बालूदान बारहठ, उदयपुर || 153

35) इक्कीसवी सदी के चुनिंदा उपन्यासों में व्यक्त लोक जीवन
प्रा.डॉ.श्रीमती कुसूम राणा-श्री.हांडे बाळू मुरलीधर, औरंगाबाद. || 156

36) महात्मा गाँधी की स्वराज्य संबंधी अवधारणा
संजय कुमार साहु, हजारीबाग। || 158


www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-03 | 0139

31

# विनोबांची सामाजिक क्रांती

**प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर**
इतिहास विभाग प्रमुख,
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर (महा.)

**********

विनोबांनी भूदान ग्रामदान कार्याबरोबरच सामाजिक कार्यांवरही भर देऊन सामाजिक चळवळी केल्या. आश्रमव्यवस्थेच्या व भूदान चळवळीच्या काळात त्यांनी अस्पृश्यता निवारण, हरिजन सेवा, मंदिर प्रवेश, ग्रामोध्दार, स्वच्छता, आरोग्य, कुष्ठसेवा, अश्लील पोस्टर विरोधी आंदोलन, दारुबंदी, भंगिकाम, परिवार नियोजन इ. सामाजिक कार्य करुन त्या संदर्भातील आपले विचारही त्यांनी वृत्तपत्रांतून लोकांसमोर मांडले.

### (१) अस्पृश्यता निवारण आणि मंदिर प्रवेश चळवळ:-

२० व्या शतकाच्या पुर्वार्धात समाजात चातुर्व व्यवस्था असून जातिव्यवस्थाही प्रखर होती. जातिधर्माची बंधने मानली जात असून अस्पृश्यता पाळली जात होती. उच्चवर्णियांनी हरिजनांना विहिरीवर, पाणवठ्यावर पाणी भरण्यास मनाई करुन मंदिर प्रवेश करण्यास मनाई होती.विनोबांनी अस्पृश्यतेचा अर्थ स्पष्ट करताना१ त्याला विरोध करुन 'अस्पृश्यता' या शब्दाला 'स्पर्शभावना' हा नवीन शब्द सांगितला.२सवर्ण हिंदूंनी हरिजन सेवेचे व्रत घेऊन हरिजनांबरोबर जीवन जगायला पाहिजे असे त्यांना वाटत होते.३ त्यामुळे त्यांनी हरिजन सेवेसाठी १९३२ मध्ये नालवाडी येथे हरिजन वस्ती आश्रम स्थापन करुन हरिजन सेवेला सुरुवातही केली.

विनोबांनी अस्पृश्यता निवारण्याचे काही उपाय सांगितले एक म्हणजे हरिजनांच्या आर्थिक अवस्थेत व मनोवृत्तीत सुधारणा करणे तर दुसरे म्हणजे हिंदू धर्माची शुध्दी करुन त्याला खऱ्या स्वरुपात आणणे.४ विनोबांनी जातिभेद हा हिंदू धर्माचा कलंक मानून वर्णव्यवस्था व जातिभेद यांच्यातील संबंध नाकारला. जातिभेदामुळे उच्चनीच भावना निर्माण होऊन सामाजिक एकतेला तडे जातात त्यामुळे समूह बनत नाही व सामाजिक कार्येही होत नाहीत याचे त्यांना वाईट वाटत होते.५ त्यांनी हरिजन सेवेचे चार पैलु मांडले.(१) सवर्णांनी सवर्णांमध्ये हरिजन कार्य करावे (२) सवर्णांनी ते काम हरिजनांमध्ये करावे (३) हरिजनांनी ते काम सवर्णांमध्ये करावे. (४) हरिजनांनी ते काम हरिजनांमध्ये करावे.६

विनांबांनी हरिजनांच्या मंदिर प्रवेशासाठी प्रयत्न केले.ज्या मंदिरात हरिजनांना प्रवेश नाही त्या मंदिरात विनोबादेखील जात नव्हते.शिवाय त्यांनी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रहदेखील केले.उदा. (अ) केरळ-वायकोम (ब) वर्धा-लक्ष्मीनारायण मंदिर (क) बिहार बैद्यनाथ धाम (ड) पुरी-जगन्नाथ मंदिर, (इ) केरळ-गुरुवायूर मंदिर (ई) कर्नाटक-महाबळेश्वर क्षेत्र (प) पंढरपूर-विठ्ठल मंदिर इत्यादी.

हरिजनांप्रमाणेच ख्रिश्चन व मुस्लिमांच्या मंदिर प्रवेशासाठी त्यांनी प्रयत्न केले.ह्या प्रसंगी त्यांनी लाठ्यादेखील खाल्या आहेत. ते स्वतः असे म्हणत ही ह्यांचा मंदिर प्रवेश हा माझा आग्रह नाही, पण जर माझे स्वागत ते त्यांच्या चर्च, गुरुद्वारा व मस्जिदीत करु शकतात तर त्यांना आपणही मंदिरात प्रवेश देऊ शकतो.

### (२) स्वच्छता विषयक चळवळ:-

विनोबांनी बाळकोबा यांच्या बरोबर भंगीकामास सुरुवात केली होती. परंतु महात्मा गांधीनी आश्रमीय कार्यांत भंगिकामाची सुरुवात केल्यामुळे नित्यनेमानेच ते हे काम करुन लागले.पण त्यांना 'भंगी' या शब्दाची विलक्षण चीड होती. म्हणुनच त्या शब्दाचा अर्थ सांगतात "चित्ताची अहंकारिता व सामाजिक मलीनता ह्यांचा नेहमी भंग करणारा म्हणजे भंगी"७ते भंगिकाम करण्याच्या कामाला अध्यात्मिक व नैतिक आधार देतात.मनाची व तनाची शुध्दता करणारा हा एक आदरणीय समाजसदस्य आहे असे आग्रहाने प्रतिपादितही करतात.

गावात भंगी ठेवण्यास विनोबांचा विरोध असून गावातीलच लोकांनी सेवाभावनेच्या दृष्टीने हे काम करावे असा त्यांचा आग्रह होता व यासाठी त्यांनी गावकऱ्यांना महात्मा गांधींचा स्मृतिदिन हा दिवसही या कामासाठी निश्चित करुन दिला.८ इतकेच नाही तर भंगिमुक्तीची चर्चा करताना भंगींनी शेती करावी.वेदाभ्यास करावा असे ते सुचवितात. शाळेतील विद्यार्थ्यांना शौचाचे महत्त्व पटवून देण्यासाठी शाळेकडे अपेक्षाही व्यक्त करतात.९

पुढे या 'भंगी' कामाला त्यांनी सफाई (स्वच्छता) ही जोड देऊन सार्वजनिक स्वच्छतेची आवश्यकता प्रतिपादित केली.स्वच्छतेचे काम हे एकाच वर्गाकडे सोपविणे व त्यांना अस्पृश्य मानणे हे त्यांना योग्य वाटत नव्हते.स्वच्छतेच्या कामाला तिरस्कार न ठेवता त्यात सेवाभावना ठेवली तर त्यात आपल्याला आवड निर्माण होऊन तिरस्कार कमी होईल असे त्यांना वाटत होते.१० त्यांनी सफाईच्या कामाला शिक्षणाचा एक विषय मानून गावागावात व घरोघरी सफाईचा आग्रह धरला११ व या दृष्टिकोनातून त्यांनी 'स्वच्छ भारत' हा कार्यक्रमही जनतेसमोर ठेवला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जनतेला सुशिक्षित करून लोकांच्या वाईट सवयी सोडण्याच्या अपेक्षाही त्यांनी व्यक्त केल्या. त्यांनी स्वच्छतेला 'स्वयंमेव क्रांती' मानले तर स्त्रिया व मुले या स्वच्छतेच्या कार्यात सहभागी झाली तर हिंदुस्थानात क्रांती घडून येईल असा आशावादही व्यक्त केला होता.१२

विनोबांनी फक्त स्वच्छतेचा विचारच सांगितला नाही तर तो प्रत्यक्षात आपल्या कृतीत उतरवलाही.त्यासाठी त्यांनी सुरगावची निवड केली. तिथे ते आपल्या काही निवडक विद्यार्थ्यांसह सफाईसाठी जाऊ लागले.आश्रमीय जीवनातही त्यांनी सफाईला विशेष महत्व दिले.पवनार आश्रमात आपल्या झोपडीसमोरील कचरा ते स्वतः साफ करीत.असे केल्याने चित्तशुध्दी करण्याची प्रेरणा मिळते अशी त्यांची धारणा होती.१३ म्हणूनच काशी व इंदौर येथे त्यांनी स्वच्छ काशी व स्वच्छ इंदौर ही स्वच्छता आंदोलनेही केली.

**(३) ग्रामोध्दार :-**

भारतातील बराच समाज खेड्यात राहत असल्यामुळे खेडे हा देशाचा आत्मा आहे त्यामुळे खरी सेवा ही खेड्यात आहे हे लक्षात घेऊन विनोबांनी १९३२ मध्ये 'ग्रामसेवा मंडळ' ही संस्था स्थापन करून त्याद्वारे ग्रामोध्दाराचे कार्य सुरु केले. त्यासाठी त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना गावात पाठवून तेथील भांडणतंटे, अस्वच्छता इत्यादीसारख्या समस्या सोडवून खेड्यांना मजबूत करण्याचे प्रयत्न आरंभिले. खेड्यांसंबंधी त्यांनी 'सेवा व्यक्तीची व भक्ती समाजाची' हे सूत्र कार्यकर्त्यांना सांगून त्या प्रमाणे कार्य करण्यास सांगितले होते.१४

स्वातंत्र्याचे आंदोलन शहरापासून खेड्यात पोहोचल्यामुळे त्यांच्या प्रचारासाठी खेड्यात जाताना कार्यकर्त्यांनी ग्रामीण बनून जावे, तिथे त्यांनी सुशिक्षितपणाच्या सवयी सोडून स्वतःला कामास लावावे.१५ तसेच स्वतःचे चारित्र्य चांगले ठेऊन लोकांची सेवा करण्यावर लक्ष केंद्रित करावे१६ व स्वतः केलेल्या कामाचे टाचणही काढावे असा सल्ला विनोबा देतात. शहरीकरणामुळे खेड्यातील बुद्धी, पैसा, व्यापार, शक्ती इत्यादी बाबी खेड्याबाहेर जाऊ नयेत म्हणून त्यांनी गावासंबंधीच्या आदर्श कल्पनेचा विचार समोर ठेवून लग्नसमारंभ, बाजार, सावकार, सरकार, व्यसने या माध्यमातून बाहेर जाणाऱ्या संपत्तीचे मार्ग बंद करण्याचे ते सुचवितात.१७ गावाच्या स्वयंपूर्णतेसाठी प्रेमभाव, उद्योग, निर्भयता, शिक्षण, स्वच्छता या पाच गुणांनी युक्त पंचायत असावी.१८ असे केल्याने गावात ग्रामराज्य येईल व रामराज्य नांदेल अशी त्यांची धारणा होती. ग्रामोध्दारासाठी सरकारी मदतीचा विरोध करून गावाची मदत आवश्यक मानली व ग्रामोध्दाराच्या प्रचारासाठी तकलीचा प्रचार करून हजारो तकल्या घरोघरी वाटल्या.१९ तसेच हे स्वतंत्र काम मानून एक महिन्याचा कार्यक्रमही निश्चित केला.

**(४) कुष्ठरोग सेवा :-**

कुष्ठरोग हा महाभयंकर रोग समजला जात होता.ज्या व्यक्तीला हा रोग झाला त्याच्याकडे समाज घृणास्पद दृष्टीने पाहत व त्याच्याशी संपर्क सोडत.तसेच ती व्यक्तीही तो रोग लपविण्याचा प्रयत्न करीत होती.तेव्हा या रोगाबद्दल जनतेच्या मनात दयावृत्ती, सहानुभूती निर्माण होण्यासाठी त्यांनी नालवाडी येथे 'महारोगी सेवा मंडळ' स्थापन करून महारोग्यांची शास्त्रीय पध्दतीने सेवा सुरु केली.२० या कार्याबद्दल सरकारकडून होणाऱ्या अपुऱ्या प्रयत्नांमुळे ते त्याला दोष देतात व ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्याचा गौरवही ते करतात.२१

विनोबा महारोग्यांची सेवा करण्यासाठी व कुष्ठरोग दूर करण्यासाठी काही उपायही सुचवितात - (१) कुष्ठरोग्यांसाठी स्वतंत्र उपचार केंद्रे सुरु करून त्या रुग्णांसाठी वेगळ्या वस्त्या तयार कराव्यात (२) त्यांना ब्रह्मविद्या शिकविण्यात यावी. (३) एखाद्या व्यक्तीला चोवीस तास कुष्ठरोग्यांसोबत ठेऊन आध्यात्मिक शिक्षणही द्यावे. (४) तसेच प्राणायाम, आसनध्यान इत्यादी गोष्टी शिकवाव्यात.२२ याच उद्देशाने अनेक संमेलनाचे उद्‌घाटक म्हणूनही त्यांनी केलेल्या भाषणातून या समस्येवरही चर्चा केली.२३ तसेच कुष्ठरोगासंबंधीच्या संघटना माध्यमातूनही त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले होते.तेव्हा विनोबांच्या या कार्यातून प्रेरणा घेऊन मनोहर दिवाण, शिवाजीराव

पटवर्धन, बाबा आमटे यांनी अनुक्रमे दत्तपूर, अमरावती, आनंदवन या ठिकाणी त्यांनी आपले आश्रम स्थापन केले.या कार्यासाठी सरकारी मदतीबरोबरच जनसेवेची भावना आवश्यक आहे असे विनोबांना वाटत होते.२४

**(५) व्यसनमुक्ती (मद्यपानबंदी) चळवळ :-**

विनोबांनी सामाजिक कार्यात व्यसनमुक्तीचा पुरस्कार करुन गावकऱ्यांना दारु, गांजा, अफु, बिडी इत्यादी व्यसन सोडण्यास सांगितले.त्यांनी ग्रामोध्दाराच्या काळात कार्यकर्त्यांना गावोगावी पाठवून मद्यबंदी विरुध्द जनतेला जागृत करण्याचे प्रयत्न चालवून दारुबंदी विरुध्द मोहीम राबविली व दारुबंदीचा कायदा सरकारने करावा असे आवाहनही केले. विनोबा म्हणतात की, "मद्यबंदी झाली नाही तर देशात सुशासन होणार नाही तर दुःशासन होईल व ते शासन मुक्तीच्या मार्गात बाधा आणेल..."२५

विनोबांनी मद्यपान बंदीसाठी शिंदीच्या झाडाची तोड करण्याचे आंदोलन वर्धा तालुक्यात चालविले तसेच तत्कालीन केंद्रिय स्वास्थ्यमंत्री श्री.रामसेवक चौधरी यांच्याशी चर्चा करुन मार्च, १९७७ मध्ये दारुबंदी कायद्याची मागणी केली.२६

**(६) डाकूंचे हृदयपरिवर्तन :-**

त्या काळात डाकूंची समस्या मोठी असून चंबळ, भिंड, मुरैना व दिल्लीच्या आजूबाजूच्या प्रदेशात मोठया प्रमाणात डाकूंचा उपद्रव सुरु होता.विनोबा काश्मीर यात्रेवर असताना चंबळ खोऱ्यातील डाकू तहसिलदारसिंग याने विनोबांना नैनिताल जेलमधून पत्र पाठवून भेटीची इच्छा व्यक्त केली होती.२७ परंतु यात्रा सोडून जाणे शक्य नसल्यामुळे विनोबांनी मेजर जनरल यदुनाथसिंह यांना आपल्या वतीने भेटीस पाठविले होते.तेव्हा झालेल्या भेटीत तहसिलदारसिंहाने डाकूंच्या आत्मसमर्पणाची इच्छा बोलून दाखविली.२८म्हणून विनोबांनी चंबळ खोऱ्यात जाऊन ती समस्या सोडविण्याचे ठरविले.

विनोबांनी डाकूंना सज्जनाची उपमा देऊन स्वतःला सज्जनाचा एक सेवक मानले२९ व डाकूंची भेट घेऊन त्यांना आत्मसमर्पण करुन पोलिसांच्या स्वाधीन होण्यास सांगितले. याप्रसंगी त्यांच्यावर अत्याचार, अन्याय होणार नाही याचे आश्वासन त्यांनी दिले.३० विनोबा डाकूंच्या समस्येबद्दल बोलताना म्हणतात की, "डाकूंची समस्या ही डरपोक लोकांची कंजूष लोकांची समस्या आहे. इंद्रिय निग्रहाची समस्या आहे ..."३१ आपण हृदय उदार बनविले पाहिज... विनोबांच्या या वक्तव्यांचा डाकूंवर परिणाम होऊन डाकू रामअवतारसिंह, लुक्का, लच्छा पंडीत यासारख्या मोठ्या डाकूंसह २० डाकूंनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले.३२

डाकूंच्या आत्मसमर्पनानंतर त्यांना एक दिवस विनोबांच्या संगतीत ठेवून त्यांच्यासोबत भजने व प्रार्थना म्हणावयास लावली.तसेच काही भगिनींनी डाकूंना राख्याही बांधल्या.त्यानंतर डाकूंना भिंड जेलमध्ये पाठविल्या गेले.३३तसेच या ठिकाणी शांती समिती स्थापन करुन चर्चेचे केंद्रही सुरु केले. विनोबा डाकूंच्या या आत्मसमर्पणाबद्दल म्हणतांत की, "... जे काही घडले ते अगदी अकल्पित होत... डाकूक्षेत्र म्हणविल्या जाणाऱ्या या क्षेत्रात हा प्रयोग झाला त्या वेळी जो मला अनुभव आला तसा कधी आला नाही. कठोर हृदये विरघळली, नरम झाली ..."३४

**(७) अश्लील पोस्टर्स विरोधी आंदोलन :-**

विनोबांनी इंदौर शहरात स्वच्छता मोहीम राबवून 'सर्वोदय वानप्रस्थ मंडळ' स्थापन केले व इंदौरला सर्वोदय नगर बनविण्याचा कार्यक्रम समोर ठेवला.३५ इंदौरच्या काही दिवसांच्या मुक्कामात ते शहरात फिरले असता रस्त्यावर चित्रपटाची मोठमोठी अशोभनीय पोस्टर्स लावलेले दिसले त्यांचे त्यांना दुःख झाले. त्यादृष्टीने इंदौरमधील चित्रपटाची रस्त्यावर लावलेली अशोभनीय पोस्टर्स हटविण्याचे आंदोलन त्यांनी हाती घेतले.त्यासाठी चित्रपटगृह मालकांशी चर्चा करुन पोस्टर्स हटविण्याची मागणी केली.३६ तेव्हा चित्रपट मालकांनी विनोबांचे तात्पुरते समाधान केले.परंतु पोस्टर्स हटविले नाहीत.म्हणून त्यांनी या संदर्भात कारवाई करण्याचे ठरविले. विनोबा म्हणतात की, "अशोभनीय पोस्टर्समुळे मुलांच्या दिल्या जाणाऱ्या तालमिला व शिक्षणाला काही अर्थ राहणार नाही..."३७ पुढे ते म्हणतात, "सिनेमांचे नियमन सर्वसामन्य चारित्र्याच्या दृष्टीने, चांगल्या अभिरुचीच्या दृष्टीने व भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने करावयास पाहिजे. तर आपण या तीन कसोट्या मान्य केल्या तर त्यात देशाचे हीत आहे नाहीतर देशाची रक्षा करणे जड जाईल".३८ तेव्हा विनोबांच्या या आंदोलनाचा परिणाम होऊन इंदौर व देशातील इतर ठिकाणची अश्लील वाटणारी पोस्टर्स फाडल्या गेली. तसेच सिनेमा मालकांनीही तशी पोस्टर्स काढून टाकली. रस्त्यावरील लावलेल्या या अश्लील पोस्टर्समुळे महिलांना मान खाली



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-03 | 0142

घालुन चालावे लागते, यामुळे हा प्रकार म्हणजे डोळ्यावर आक्रमण आहे.असे विनोबांनी सांगून लहान मुलांच्या बाबतीत हे पोस्टर्स म्हणजे 'फ्री अँड कंपलसरी एज्युकेशन इन सेन्सुर्एलटी' असे म्हटले.३९विनोबा हे चित्रपट उद्योगाच्या विरोधी नव्हते तर उद्योगाने मनोरंजन व शिक्षण हे उद्देश समोर ठेऊन आयोजन व नियोजन करावे असे त्यांना वाटत होते.या दृष्टीने त्यांनी चित्रपट सेन्सार बोर्ड व चित्रपट उद्योजक यांना सहयोगाची वृत्ती ठेवण्याची विनंती केली होती.४०

**(८) स्त्री विषयक चळवळ :-**

स्त्रियांनी सिनेमा व जाहिराती, पडदापध्दती, हुंडापध्दती, दारुबंदी, धान्यसमस्या इत्यादीपासुन स्वतःला दूर ठेवावे त्याचबरोबर शांतीरक्षा सर्वोदय, शीलरक्षा, अहिंसा, सेवा कार्य या कामी स्त्री शक्तीचा उपयोग व्हावा तसेच अध्यात्म, ज्ञान, भक्ती, ब्रम्हविद्या प्राप्त करुन उद्योगी, स्वावलंबी बनावे व प्राथमिक शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्रे, बालसंगोपन ही क्षेत्रे आपल्या हाती घ्यावीत असे त्यांना वाटत होते.४१ विनोबा स्त्रियांची विशेष जबाबदारी सांगताना प्रथम कृती मग किर्ती ... व त्यातून संस्कृती ... याचा कार्यक्रम ते समोर ठेवतात व त्यासाठी

"कीर्तिः श्रीर वाक् च नारीणां
स्मृतिर मेधा धृतिःक्षमा..."४२

अर्थात किर्ती, श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृति, क्षमा या सप्तशक्तीची आवश्यकता ते प्रतिपादन करतात.स्त्रियांविषयी विशेष आदर दाखविणे विनोबांना योग्य वाटते.परंतु त्यांना देवी म्हणणे हा एक प्रकारचा तिरस्कार ते मानतात.४३ स्त्रियांचे सौंदर्य हे उपभोग्य नसून ते परमेश्वराचे सर्जन आहे, पूजा आहे ... असे ते म्हणतात.४४

विनोबांनी स्त्रियांसाठी दोन कार्यक्रम सांगितले- (१) अशांततेच्या काळात भांडवतंटे न करता शांत राहणे, (२) शांतीच्या काळात सर्वोदयपत्र, खादीप्रचार, साहित्यप्रचार इत्यादी कामे करणे.४५ विनोबा स्त्रियांना संरक्षणासाठी तलवार व बंदुक ठेवण्याची परवानगी देतात.परंतु कुणालाही जिवंत न मारता फक्त जखमी करण्याचे सांगुन४६ स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कारही करतात.४७

विनोबांनी वर्धा आश्रमात कन्या शाळा मंडळ सुरु करुन त्यात ब्रह्मचारीणी शिक्षणावर भर दिला.पुढे कन्याशाळेचे रुपांतर कन्याश्रमात करण्यात आले.स्त्रियांसाठी प्रवचने व मार्गदर्शनही केले. तसेच त्यांनी १९६० मध्ये पवनार येथे ब्रह्मविद्या मंदिर व १९६१ मध्ये लखिमपुर येथे मैत्री या आश्रमाची स्थापना करुन १९७४ मध्ये स्त्रीशक्ती संमेलनही भरविले होते व या संमेलनाच्या माध्यमातून स्त्रीविषयावर चर्चाही घडवून आणून त्यांच्या अधिकाराकरिता शासकीय स्तरावर काय करता येईल याचा विचार त्यांनी केला होता. ते म्हणतात की, "आतापर्यंत कुटुंबरचना स्त्रियांच्या हातात होती तेव्हा आता पुरुषांनीही त्यात भाग घ्यावा आणि एक वेळचा स्वयंपाकही करावा"४८ पुढे ते सांगतात की, "स्त्रियांनी अखंड ज्ञान साधना करावी, सोबत भक्तीची कास धरावी ज्यामुळे ती समाजाला मार्गदर्शन करु शकेल. स्त्रीने वाघाप्रमाणे गर्जना करावी त्यात नैतिक आचरण व ब्रह्मनिष्ठेची शक्ती असावी ... शांत न राहता समाजाला प्रभावित करावे"४९ असे विनोबांना वाटते.

विनोबा स्त्रियांना प्रथम व श्रेष्ठतम गुरु मानतात.लहान मुलांना घडविण्याची जबाबदारी स्त्रियांवरच सोपविण्यास ते सांगतात. प्राथमिक शिक्षणाचा अधिकार स्त्रियांच्या हाती देऊन सरकारने पंचवार्षिक योजनेत तशी तरतुद करावी असा सल्लाही ते देतात.५०

विनोबांनी आपल्या भूदान पदयात्रेत स्त्री जागृती मोहिम हाती घेतली होती. स्त्रियांनी तर पदयात्रा काढल्यास समाजात जागृती घडण्यास मदत होईल. या त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन दोन महिला इंदोरच्या कस्तुरबा भवनातून पदयात्रेसाठी निघाल्या होत्या.जेव्हा १९६७ साली निघालेली ही पदयात्रा नेपाळ, श्रीलंकेतूनही जाऊन आली व डिसेंबर १९७९ मध्ये त्या यात्रेची समाप्ती ब्रह्मविद्या मंदिर, पवनार येथे होणार होती.तेव्हा या प्रसंगी जगभरातील या दिशेने काम करणाऱ्या स्त्रियांनी एकत्र यावे व एक विश्व महिला संमेलन आयोजित करावे अशी कल्पना विनोबांनी मांडली. त्यामुळे ३० डिसेंबर १९७९ ते १ जानेवारी १९८० या कालावधीत महिला विश्व संमेलन पार पडले. त्यात परदेशातून ५० व भारतातून १००० महिला सामील झाल्या होत्या. यावेळी विनोबांनी आपले विचार व्यक्त करुन स्त्रियांकडून 'विश्वमानुषी' बनण्याची अपेक्षा व्यक्त करतात.५१

**मुल्यमापन :-**

विनोबा कुणी शिकलेले समाजशास्त्रज्ञ किंवा ग्रामीण विकासाचे विशेषज्ञही नव्हते, तरीही त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाच्या प्रभावाने व आपल्या विचाराने सामाजिक चळवळीद्वारे ग्रामीण

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-03 | 0143

जीवनाच्या परिवर्तनाची प्रक्रिया सुरु केली होती.ग्रामोद्योगाच्या माध्यमातुन स्वावलंबनाचा व स्वयंपुर्णतेचा आदर्श विनोबांनी गावकऱ्यांना घालुन दिला.अस्पृश्यता हा कलंक आहे म्हणून अस्पृश्यता निवारणाचे कार्य त्यांनी मोठ्या तळमळीने केले.हरिजनांसाठी मंदिर प्रवेश, विहिरीचा समान वापर यासाठी त्यांनी जातीने प्रयत्न केलेत पण हे करण्याकरिता हृदयपरिवर्तनाची आवश्यकता आहे, असे त्यांचे मत होते.स्वच्छतेच्या कार्यामुळे ते 'स्वच्छतादूत' ठरतात.

सरकारलाही शस्त्राच्या बळावर जी गोष्ट शक्य झाली नाही ती गोष्ट त्यांनी आपल्या कार्याने व वाणीने करुन डाकूंचेही मनपरिवर्तन घडवुन आणले व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून समाजातील लोकांचा विश्वास मिळवून दिला. व्यक्ती ही जन्मापासुन डाकू नसुन भ्रष्ट राजनिती व समाज व्यवस्थेमुळे डाकू बनते हे त्यांनी लोकांना समजावुन दिले व डाकूंचेसुध्दा परीवर्तन चांगल्या व्यक्तीत होऊ शकते हे दाखवुन दिले. समाजातील विकृती दूर करण्यासाठी त्यांनी इंदौरला अश्लील पोस्टर्स विरोधी आंदोलनही राबविले होते.याशिवाय कुष्ठसेवा, स्वच्छता, आरोग्य या बाबतीतही त्यांनी विचार करुन कार्य केले.ते स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते.स्त्री व पुरुष हे दोघेही समान आहेत असे त्यांचे मत होते.तेव्हा त्याच्या सामाजिक चळवळी या सामाजिक दृष्टीचा विचार करुन केल्या होत्या.म्हणुनच विनोबा हे समाजशास्त्रज्ञ व समाजसुधारक ठरतात.

**संदर्भ साधने**


**प्राथमिक साधने (मराठी)**

१) विनोबा, 'चंबळच्या खोऱ्यात', परंधाम प्रकाशन पवनार, १९६१.

२) विनोबा, 'जीवनदृष्टी', परंधाम प्रकाशन पवनार, १९९६.

३) विनोबा, 'प्रेमपंथ अहिंसेचा', परंधाम प्रकाशन, पवनार २००३.

४) विनोबा, 'मधुकर', परंधाम प्रकाशन, पवनार २००६.

५) विनोबा, 'स्त्री शक्ती', परंधाम प्रकाशन पवनार १९९९.

६) विनोबा, 'लोकनीती', परंधाम प्रकाशन, पवनार २००४.

७) विनोबा, 'ही एकादश सेवावी', परंधाम प्रकाशन पवनार, २००७.

**प्राथमिक साधने (हिंदी)**

१) बजाज रामकृष्ण, 'विनोबा के पत्र बजाज परिवार के नाम', सस्ता साहित्य प्रकाशन, दिल्ली, १९६२.

२) ब्राळकोबा (संपा), 'विनोबा के प्रेरक पत्रांश', सर्व सेवा संघप्रकाशन, वाराणसी, १९८५.

३) विनोबा, 'अशोभनिय पोस्टर्स', अखिल भारतीय सेवा संघ प्रकाशन, काशी, १९६१.

४) विनोबा, 'कुष्ठरोग और विनोबा', परंधाम प्रकाशन, पवनार, १९८४.

५) विनोबा, 'ग्रामदान', अखिल भारतीय सेवा संघ प्रकाशन, राजघाट, १९५७.

६) विनोबा, 'नारी की महिमा', सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणशी, १९९२.

७) विनोबा, 'विनोबा और अस्पृशता उन्मुलन', हरीजन सेवक संघ प्रकाशन, दिल्ली.

८) विनोबा, 'विनोबा के विचार', सस्ता साहित्य प्रकाशन, दिल्ली.

९) विनोबा, 'विनोबा साहित्य खंड-१३', परंधाम प्रकाशन, पवनार १९९८.

१०) विनोबा, 'विनोबा साहित्य खंड-१५', परंधाम प्रकाशन, पवनार, १९९५.

११) विनोबा, 'विनोबा साहित्य खंड- १८', परंधाम प्रकाशन, पवनार, २०००.

**दुय्यम साधने (मराठी)**

१) भावे शिवाजी, 'विनोबा चरित्र', परंधाम प्रकाशन, पवनार, १९९५.

२) लांजेवार विठ्ठल, 'ब्रम्हर्षी विनोबा', ऋचा प्रकाशन, नागपुर १९९५.

**साप्ताहिके**

१) मैत्री, मार्च १९७३

२) मैत्री, एप्रिल १२, १९७६

३) हरीजन सेवक, आक्टोंबर २०, १९४६